* मुख्य संपादक *
सुग्रीव सोपानराव मुंडे
* आवृत्ती संपादक *
लक्ष्मीकांत नामदेवराव मुंडे

निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
# आत्ताच एक्सप्रेस
* नांदेड * परभणी * हिंगोली

E-Paper :
www. attachexpress.in
Post Regd.No.
LII/PBN/RNP-183/20021-22

* वर्ष १० वे * अंक २९६ * किंमत - २ रु | RNI.No. MAH/MAR2014/56289 | * रविवार दि.०१ मार्च २०२६ | * पाने-४

# वनविभागाच्या नाकावर टिचून सागवान तस्करीचा धुमाकूळ

## तालुक्यातील जंगलात सर्रास वृक्षतोड; माहूर वन विभाग झोपेत का? नागरिकांचा संतप्त सवाल

* आत्ताच एक्सप्रेस
**राजीक शेख**

**माहूर–** तालुक्यातील सायफळ, मदनापुर,गोकुळ, तुळशी, वानोळा, पानोळा,वजरा,दत्त मांजरी, पाचुंदा, कुपटी, या गाव भागातील वनसंपदेवर दिवसेंदिवस गंभीर संकट निर्माण होत असल्याचे चित्र समोर येत आहे. वनविभागाच्या नाकावर टिचून मोठ्या प्रमाणात वृक्षतोड सुरू असून सागवानासारख्या मौल्यवान झाडांची खुलेआम कत्तल केली जात असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून सातत्याने केल्या जात आहेत. विशेष म्हणजे वन कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीतच सागवानाची लाकडे वाहतूक केली जात असल्याचा आरोप स्थानिक ग्रामस्थांनी केला असून याबाबत अद्याप ठोस कारवाई न झाल्याने वनविभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

माहूर तालुका हा नैसर्गिक संपदेने समृद्ध आणि जैवविविधतेने नटलेला परिसर म्हणून ओळखला जातो. मात्र गेल्या काही महिन्यांपासून या भागात अवैध वृक्षतोडीचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत आहे. सागवानासह विविध प्रकारच्या मौल्यवान वृक्षांची कत्तल करून त्यांची वाहतूक सर्रास केली जात असल्याच्या घटना उघडकीस येत असून वनविभाग मात्र याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप होत आहे.

**सागवान वृक्षांची खुलेआम कत्तल**


सागवान हे अत्यंत मौल्यवान लाकूड मानले जाते. बांधकाम, फर्निचर व अन्य औद्योगिक वापरासाठी त्याला मोठी मागणी आहे. त्यामुळे सागवानाची अवैध तोड करून काळ्या बाजारात विक्री केली जात असल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी दिली आहे. जंगल परिसरातून रात्रीच्या वेळी मोठ्या वाहनांद्वारे लाकडाची वाहतूक केली जाते. अनेकदा ही वाहतूक वन कर्मचाऱ्यांच्या नजरेसमोरून होत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, जंगलातील मोठमोठी झाडे कापून त्यांचे तुकडे करून ट्रॅक्टर किंवा इतर वाहनांद्वारे बाहेर नेले जातात. काही ठिकाणी झाडांचे अवशेष स्पष्टपणे दिसत असूनही वनविभागाने तपास किंवा पंचनामा करण्यास टाळाटाळ केल्याचे सांगितले जाते.

**वनविभागाची निष्क्रियता का?**

या प्रकारांबाबत अनेक वेळा स्थानिक प्रशासन व वन अधिकाऱ्यांकडे तक्रारी करण्यात आल्या आहेत. तसेच विविध वृत्तपत्रांमधून यासंबंधी वारंवार बातम्या प्रकाशित झाल्या आहेत. मात्र तरीही कोणतीही ठोस कारवाई झालेली दिसत नाही. त्यामुळे वनविभागाच्या निष्क्रियतेमागे नेमके कारण काय, असा प्रश्न सर्वसामान्य नागरिक उपस्थित करत आहेत.

स्थानिकांच्या मते, अवैध वृक्षतोडीमध्ये मोठ्या आर्थिक व्यवहारांचा संबंध असल्याने संबंधितांवर कारवाई करण्यास वनविभाग टाळाटाळ करत आहे. काही नागरिकांनी वन कर्मचाऱ्यांवर संगनमताचेही आरोप केले आहेत. तथापि, या आरोपांबाबत अधिकृतरीत्या कोणतीही भूमिका स्पष्ट करण्यात आलेली नाही.




**पर्यावरणावर गंभीर परिणाम**

वृक्षतोडीमुळे पर्यावरणावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. जंगलातील वृक्षसंख्या कमी झाल्यास वन्यजीवांचे नैसर्गिक अधिवास नष्ट होतात. यामुळे वन्यजीव मानवी वस्तीकडे वळण्याचा धोका वाढतो. तसेच भूजल पातळी कमी होणे, मृदा धूप वाढणे, हवामानातील असंतुलन यासारखे परिणाम दीर्घकालीन स्वरूपात जाणवू शकतात. तज्ञांच्या मते, जंगलातील सागवानासारख्या वृक्षांची वाढ होण्यासाठी अनेक वर्षे लागतात. अशा वृक्षांची बेकायदेशीर तोड केल्यास पर्यावरणीय संतुलन बिघडते. त्यामुळे वनसंपदेचे संरक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे.

**स्थानिक प्रशासनाची जबाबदारी**

वनसंपदेचे संरक्षण करणे ही वनविभागाची प्राथमिक जबाबदारी आहे. मात्र सद्यस्थितीत वनविभागाकडून अपेक्षित तत्परता दिसत नसल्याची टीका होत आहे. जंगलातील गस्त वाढवणे, अवैध वृक्षतोडीवर नियंत्रण ठेवणे, दोषींवर कठोर कारवाई करणे आणि जनजागृती करणे या बाबींकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

महाराष्ट्र वन विभाग यंत्रणेकडून प्रभावी नियंत्रणासाठी विशेष पथके नियुक्त करणे, संवेदनशील भागात तपासणी नाके उभारणे आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जंगलावर लक्ष ठेवणे आवश्यक असल्याचे पर्यावरण अभ्यासकांचे मत आहे.

**नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण**

वनविभागाच्या उदासीन भूमिकेमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण आहे. अनेक सामाजिक कार्यकर्ते व पर्यावरणप्रेमींनी याविरोधात आवाज उठवण्यास सुरुवात केली आहे. जंगल वाचवण्यासाठी जनआंदोलन उभारण्याचा इशाराही काही संघटनांनी दिला आहे.

स्थानिक ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, "जंगल हे आमचे नैसर्गिक संपत्ती आहे. त्याचे रक्षण करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. मात्र वृक्षतोडीच्या घटनांवर कोणतीही कारवाई होत नसल्याने वनमाफियांचे मनोबल वाढत आहे."

**प्रशासनाकडून चौकशीची मागणी**

या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्या कार्यपद्धतीची चौकशी करावी, तसेच अवैध वृक्षतोड रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी जोर धरत आहे. तसेच जंगल परिसरात सीसीटीव्ही यंत्रणा, ड्रोन सर्वेक्षण, नियमित गस्त आणि तक्रार निवारण प्रणाली प्रभावीपणे राबवण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात येत आहे.

**शासनाच्या भूमिकेकडे लक्ष**

या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन राज्य शासनाने हस्तक्षेप करावा, अशी मागणी होत आहे. वनसंपदेचे संरक्षण हे केवळ पर्यावरणासाठी नव्हे तर भविष्यातील पिढ्यांसाठी आवश्यक असल्याने शासनाने कठोर पावले उचलणे गरजेचे आहे.

महाराष्ट्र राज्यातील विविध भागांमध्ये अवैध वृक्षतोडीच्या घटना वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर वनसंपदेच्या संरक्षणासाठी व्यापक धोरण आखण्याची गरज अधोरेखित होत आहे.

माहूर तालुक्यातील वाढती वृक्षतोड आणि सागवान तस्करी ही अत्यंत गंभीर बाब असून याकडे दुर्लक्ष करणे भविष्यासाठी धोकादायक ठरू शकते. वनविभागाने तातडीने कारवाई करून दोषींवर कठोर शिक्षेची तरतूद करणे आवश्यक आहे. तसेच नागरिकांच्या तक्रारींना गांभीर्याने घेत जंगल संरक्षणासाठी ठोस उपाययोजना राबवणे ही काळाची गरज आहे.

वनसंपदा ही राष्ट्राची अमूल्य संपत्ती आहे. तिचे रक्षण करणे ही केवळ शासनाचीच नव्हे तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. मात्र प्रशासनाची प्रभावी भूमिका आणि कठोर अंमलबजावणीशिवाय अवैध वृक्षतोडीला आळा बसणे कठीण आहे. त्यामुळे या गंभीर प्रकरणाकडे शासन आणि संबंधित विभागांनी तातडीने लक्ष देण्याची अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

# अंबाडी घाटात मध्यरात्री भीषण अपघात : कार दरीत कोसळून पेटली, प्रवाशांचा शोध सुरु

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

**किनवट –** किनवट –आदिलाबाद मार्गावरील अंबाडी घाटात मध्यरात्री सुमारास भीषण अपघात घडला. तीव्र वळणावर चालकाचे नियंत्रण सुटल्याने एक अज्ञात कार रस्त्याच्या कडेला असलेल्या खड्ड्यात कोसळली. खाली कोसळल्यानंतर वाहन रस्त्यालगतच्या झाडावर आदळले आणि अचानक पेट घेतल्याने काही वेळातच पूर्णपणे जळून खाक झाले.

हा अपघात इतका भीषण होता की काही वेळातच कारचा केवळ सांगाडा शिल्लक राहिला. आगीत कारमधील प्रवाशांचे काय झाले याबाबत अद्याप ठोस माहिती समोर आलेली नाही. ते सुरक्षित बाहेर पडले की आगीत अडकले होते , याचा तपास सुरू आहे.

घटनेची माहिती मिळताच किनवट पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार ओंकार पुरी व पोलीस शिपाई डगवाल यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा व तपासाची कार्यवाही सुरू केली. वाहन मालक व प्रवाशांचा शोध घेतला जात आहे.



अंबाडी घाटातील धोकादायक वळणे अनेकदा अपघातांना कारणीभूत ठरत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

विशेषतः रात्रीच्या वेळी प्रवास करताना वाहनचालकांनी अधिक सावधगिरी बाळगावी, असे आवाहन पोलीस व सुजाण नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# भारतात दोन विचारधारांचे युद्ध, काँग्रेसची तिखट टीका

आत्ताच एक्सप्रेस

**मुंबई –** भारतात दोन विचारधारांची लढाई सुरू आहे. काँग्रेसची विचारधारा संविधानाची आहे. तर भाजपची विचारधारा स्पृश्य व अस्पृश्यता मानणाऱ्या मनुवादाची आहे, अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज भाजपवर निशाणा साधताना केली. कोकणातील चिपळूण येथे काँग्रेसचे विभागीय प्रशिक्षण शिबिर सुरू आहे. या शिबिराच्या दुसऱ्या दिवशी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना हर्षवर्धन सपकाळ यांनी भाजपवर उपरोक्त शब्दांत निशाणा साधला. ते म्हणाले, भारतात दोन विचारधारांची लढाई सुरू आहे. एक विचारधारा काँग्रेसची आहे, तर दुसरी भाजपची. काँग्रेस व भाजपच्या स्वप्नातील भारत वेगळा आहे. काँग्रेसचा प्रयत्न संविधानाला अभिप्रेत भारत निर्माण करण्याचा आहे. तर भाजपचा विचार हा देश फक्त मूठभर लोकांचा असावा व स्पृश्य – अस्पृश्यता मानणाऱ्या मनुवादाचा आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व भाजपला सत्ता व संपत्ती हवी आहे. त्यांना सर्व यंत्रणांवर ताबा हवा आहे. हिंसा, द्वेष व भय पसरवणे, असत्य कथन करणे व देश हा मूठभर लोकांच्या हाती असावा अशी त्यांची संकल्पना आहे. आज त्याच पद्धतीचे वातावरण देशात आहे. निवडणूक आयोग, ईडी, सीबीआय, न्यायपालिका, सरकारी यंत्रणा आदी सर्व संस्थांवर भाजपने कब्जा केला आहे. त्यांनी देशभर थैमान घातले आहे. भाजप मनुस्मृती व बंच ऑफ थॉटला अभिप्रेत भारत निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. काँग्रेसची भूमिका याहून अगदी उलट आहे. ते पुढे म्हणाले, हा देश सर्वांचा आहे. देशातील संपत्तीवर सर्व जनतेचा समान अधिकार आहे. सत्तेचे विकेंद्रीकरण हा काँग्रेसचा विचार आहे. देश संविधानानुसार चालला पाहिजे ही काँग्रेसची भूमिका आहे. या संविधानात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या हिंदवी स्वराज्याचे, शिव, शाहू, फुले, आंबेडकर, संत, वारकरी संप्रदाय, बसवेश्वर महाराज यांचे विचार आहेत. स्वतंत्र भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळात पंडित जवाहरलाल नेहरू यांनी ६ बिगर काँग्रेसी नेत्यांना स्थान दिले होते. यामागे सर्व विचारधारांना सहभागी करवून घेण्याचा विचार होता.



# शिशु वाटिका बालसंस्कार केंद्र शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

**किनवट –** कलावती गार्डन येथे विद्या शिशु वाटिका शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात आणि आनंदमय वातावरणात पार पडले. कार्यक्रमाला पालक, शिक्षक व परिसरातील नागरिकांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. रंगीबेरंगी सजावट, आकर्षक प्रकाशयोजना आणि चिमुकल्यांच्या निरागस सादरीकरणांमुळे संपूर्ण परिसर आनंदाने उजळून निघाला होता.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने व स्वागतपर भाषणाने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करत उपस्थितांची मने जिंकली. देशभक्तीपर गीत, लयबद्ध नृत्य आणि वेशभूषा सादरीकरण यांमधून विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे सुंदर दर्शन घडले. चिमुकल्यांचा आत्मविश्वास, समन्वय आणि मेहनत पाहून उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट करून त्यांचे कौतुक केले.

कार्यक्रमातील विशेष आकर्षण ठरलेले नृत्य सादर करताना अर्णव भदाणे याने स्टेजवर प्रभावी व आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण करून सर्वांची दाद मिळवली. त्याच्या नृत्यातील लयबद्धता आणि भावपूर्ण सादरीकरणामुळे प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल शाळेच्या व्यवस्थापनाने शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करत भविष्यातही अशाच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येईल, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

स्नेहसंमेलनामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळाले असून उपस्थित पालकांनी कार्यक्रमाचे मनापासून कौतुक केले.

# अमेरिका–इस्रायलचे इराणच्या अनेक शहरांवर हल्ले

## इराणकडूनही प्रत्युत्तर, इस्रायलवर ४०० क्षेपणास्त्रे डागली; कतार, बहरीन आणि युएईमधील अमेरिकेच्या लष्करी तळांवर हल्ला

आत्ताच एक्सप्रेस

**नवी दिल्ली -** इस्रायल आणि अमेरिकेनं संयुक्त कारवाईत इराणची राजधानी तेहरानसह अनेक शहरांवर हल्ला केला. प्रत्युत्तर म्हणून इराणने इस्रायलवर प्रत्युत्तरात्मक हल्ले केले. मीडिया रिपोर्ट्सनुसार, इराणने अंदाजे ४०० क्षेपणास्त्रे डागून प्रत्युत्तर दिले. इस्रायल व्यतिरिक्त, इराणने कुवेत, कतार, बहरीन आणि सौदी अरेबियामधील अमेरिकन तळांवरही हल्ला केला. इराणने युएईचे सर्वाधिक लोकसंख्या असलेले शहर दुबईलाही लक्ष्य केले. इस्रायलने इराणचे गुप्तचर मंत्रालय, संरक्षण मंत्रालय, सर्वोच्च नेते खमेनी यांचे कार्यालय आणि इराणच्या अणुऊर्जा संघटनेला लक्ष्य केलं आहे. हल्ल्यानंतर इराणचे सर्वोच्च धर्मगुरु अयातुल्ला अल खमेनींना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आलं आहे.

इराणच्या फार्स वृत्तसंस्थेनुसार, कतारमधील अल-उदेद हवाई तळ, कुवेतमधील अल-सलेम हवाई तळ, संयुक्त अरब अमिरातीमधील अल-धफ्रा हवाई तळ आणि बहरीनमधील पाचव्या अमेरिकन तळावर इराणी क्षेपणास्त्र हल्ल्यांचे लक्ष्य करण्यात आले.

रॉयटर्स वृत्तसंस्थेने वृत्त दिले की युएईची राजधानी अबू धाबीमध्ये एक शक्तिशाली स्फोट झाला.

इराणचे सर्वोच्च नेते खामेनी तेहरान सोडले आहेत. द गार्डियनने दिलेल्या वृत्तानुसार त्यांना सुरक्षित ठिकाणी नेण्यात आले आहे. रॉयटर्स आणि न्यू यॉर्क टाईम्सच्या वृत्तानुसार अमेरिका आणि इस्रायली हल्ल्यांचे मुख्य लक्ष्य इराणी अधिकारी होते.

सुरक्षेच्या कारणास्तव मध्य पूर्वेतील अनेक आंतरराष्ट्रीय उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत आणि अनेक देशांनी त्यांचे हवाई क्षेत्र बंद केले आहे. विझ एअरने ७ मार्चपर्यंत इस्रायल, दुबई, अबू धाबी आणि अम्मानला जाणाऱ्या सर्व उड्डाणे रद्द केली आहेत. लुफ्थांसाने दुबई, तेल अवीव, बेरूत आणि मस्कतला जाणाऱ्या शनिवार आणि रविवारच्या उड्डाणे रद्द केली आहेत.

इराणने इस्रायलच्या शेजारील देश बहरीनमधील अमेरिकेच्या लष्करी तळावर अनेक क्षेपणास्त्रे डागली आहेत. अमेरिका कतारच्या अल उदेद हवाई तळावर आहे. कतारकडून एक इराणी क्षेपणास्त्र रोखण्यात आले. कतारच्या संरक्षण मंत्रालयाने म्हटले आहे की



त्यांच्या पॅट्रियट संरक्षण यंत्रणेने इराणी क्षेपणास्त्र रोखले.

येमेनमधील इराण समर्थित हुथी बंडखोरांनी सागरी मार्ग आणि इस्रायलला लक्ष्य करून क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. वरिष्ठ हुथी नेत्यांनी सांगितले की पहिला हल्ला आज रात्री होऊ शकतो. ट्रम्प प्रशासनाशी करार झाल्यानंतर हुथी बंडखोरांनी यापूर्वी लाल समुद्रातील जहाजांवर आणि इस्रायलवरील हल्ले थांबवले होते.

अमेरिका आणि इस्रायलने संयुक्तपणे इराणवर आज मोठे हवाई हल्ले केले आहेत, तर इराणनेही अमेरिका आणि इस्रायलला जोरदार प्रत्युत्तर देत प्रतिहल्ले केले आहेत. त्यामुळे आता अमेरिका–इस्रायल आणि इराणमध्ये युद्ध भडकलं आहे. इस्रायलने केलेल्या हल्ल्यात तेहरानमध्ये शनिवारी अनेक मोठे स्फोट झाले आहेत.

इस्रायलने केलेल्या हल्ल्यानंतर इराणच्या संरक्षणमंत्र्यांनी देशभरात आणीबाणीची घोषणा केली. दरम्यान इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर आता एक मोठी बातमी समोर आली आहे. अमेरिका आणि इस्रायलने संयुक्तपणे केलेल्या हल्ल्यात दक्षिण इराणमधील ४० शाळकरी मुलींचा मृत्यू झाल्याचा दावा इराणने केला आहे.

इस्रायल–अमेरिकेने केलेल्या या हल्ल्यात इराणच्या मिनाबमधील किमान ४० शाळकरी मुलींचा मृत्यू झाल्याचं वृत्त या वृत्तसंस्थेच्या हवाल्याने इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे. इराणच्या होर्मोज्गान प्रांतातील मिनाब येथे झालेल्या हल्ल्यात किमान ४५ जण जखमी झाले असल्याचंही वृत्तात म्हटलं आहे. दरम्यान, या हल्ल्यात ४० शाळकरी मुलींचा मृत्यू झाल्याचा दावा इराणकडून करण्यात आला असला तरी याबाबत अमेरिका किंवा इस्रायलने अद्याप कोणतीही अधिकृत माहिती दिलेली नाही.

इराणने सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या कार्यालयाजवळ अमेरिका आणि इस्रायलने केलेल्या संयुक्त हल्ल्याचा बदला म्हणून एकाच वेळी इस्रायल, बहरीन, युएई आणि कतारवर बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागली. वृत्तानुसार, युएईची राजधानी अबू धाबी येथे स्फोटांचे आवाज ऐकू आले, तर कतारच्या क्षेपणास्त्र संरक्षण यंत्रणेने एक क्षेपणास्त्र हवेतच रोखले. अबू धाबी आणि कतारची राजधानी दोहा येथील अमेरिकन हवाई तळांवर प्रत्यक्ष हल्ला झाला की नाही, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र त्या ठिकाणी सायरन वाजल्याची माहिती आहे.

# पत्रांच्या माध्यमातून जोडलेले जागतिक नाते

''एकाच छताखाली अनुभवा मराठी भाषेचे वैभव आणि अक्षरांचा नयनरम्य उत्सव!''

अक्षरोत्सव : पत्रांतून जपलेला जागतिक साहित्याचा आणि स्नेहाचा अनमोल ठेवा

२० वर्षांचा अविरत वारसा : अक्षरांच्या पाऊलखुणा जपणारा अक्षरोत्सव: पत्रकार निकेत पावसकर यांचा २० वर्षांचा ध्यास : शालेय मुलांमध्ये लेखनाची ओढ.: राज्यभर प्रदर्शनांचे आयोजन

''मान्यवरांची शाबासकी आणि मुलांचे कुतूहल... हाच अक्षरोत्सवचा खरा ठेवा! अक्षरांच्या या अद्भुत जगाला २० वर्षे पूर्ण होत आहेत, हा मराठी भाषेचाच सन्मान आहे!

डिजिटल क्रांतीच्या ओघात आजची पिढी कीबोर्ड आणि टचस्क्रीनच्या आहारी जात असताना, हाताने लिहिलेली सुंदर अक्षरे आणि साहित्याचा वारसा जपणे हे मोठे आव्हान बनले आहे. हेच आव्हान पेलले आहे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पत्रकार निकेत पावसकर यांनी. गेल्या दोन दशकांहून अधिक काळ त्यांनी अक्षरोत्सव या उपक्रमाच्या माध्यमातून अक्षरांची संस्कृती घराघरांत आणि मनामनांत पोहोचविण्याचे प्रयत्न करत आहेत.

मराठी राजभाषा दिनाच्या निमित्ताने आपण भाषेचा अभिमान बाळगत असतानाच, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तळेरे सारख्या ग्रामीण भागातून उभी राहिलेली एक विलक्षण चळवळ आज सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. ती चळवळ म्हणजे अक्षरोत्सव. तंत्रज्ञानाच्या युगात जिथे पत्रसंस्कृती लोप पावत आहे, तिथे केवळ एका पत्राच्या माध्यमातून जगभरातील दिग्गजांशी पत्रमैत्री जुळवण्याचा चमत्कार या संग्रहाने करून दाखवला आहे. डिजिटल स्क्रीनच्या जमान्यात जेव्हा मुले लेखणीपासून दूर जात आहेत, अशा काळात अक्षरोत्सवने अक्षरांच्या माध्यमातून संस्कृतीची गुंफण घातली आहे.

मराठी भाषेचा अभिमान आणि साहित्याचा वारसा पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणे, हे केवळ कर्तव्य नसून ती काळाची गरज आहे. याच ध्येयाने झपाटलेली अक्षरोत्सव ही चळवळ गेल्या २० वर्षांपासून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात अक्षरांचे बीज पेरत आहे. केवळ एक संग्रह म्हणून मर्यादित न राहता, या उपक्रमाने मुलांच्या मनात साहित्याची ओढ निर्माण करण्याचे मोठे काम सुरु केले आहे.

**अफाट व्याप्ती : २००० दिग्गजांची साथ**

या संग्रहाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे सुप्रसिद्ध कवी विंदा करंदीकर यांच्या पात्रापासून सुरु झालेल्या या संग्रहात देश-परदेशातील तब्बल २००० दिग्गज व्यक्तींच्या हस्ताक्षरातील संदेशांचा समावेश आहे. केवळ स्वाक्षरी नाही, तर त्या व्यक्तींच्या भावना व्यक्त करणारी संदेश पत्रे हे या संग्रहाचे वैभव आहे. यामध्ये नोबेल विजेते, भारतरत्न, पद्म पुरस्कार सन्मानित व्यक्तींपासून ते ज्ञानपीठकार आणि साहित्य अकादमी विजेत्यांपर्यंतच्या मान्यवरांच्या अक्षरांचा ओलावा जपलेला आहे.

**भाषा आणि लिपींचा संगम**

मराठी भाषेचा अभिमान बाळगतानाच या संग्रहाने जागतिक दृष्टिकोन जपला आहे. यात प्रामुख्याने मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेतील पत्रे असली, तरी संस्कृत, कोकणी, मोडी, ब्राम्ही, चायनीज आणि अंधांसाठीची ब्रेल लिपी अशा विविध लिपींमधील संदेशांचा खजिना येथे पहायला मिळतो. हा संग्रह म्हणजे खऱ्या अर्थाने अक्षर वाङ्मयाचा उत्सवच आहे.

**संस्कृती आणि साहित्याचा संगम**

अक्षरोत्सव म्हणजे केवळ कागदावरची अक्षरे नव्हेत, तर ती आपल्या लोककला, संस्कृती आणि समृद्ध साहित्याचा आरसा आहे. गेल्या दोन दशकांत या संग्रहाने राज्याच्या विविध भागांत प्रदर्शने भरवून मराठी भाषेचे वैभव जनसामान्यांपर्यंत, विशेषतः शालेय विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवले आहे.हा प्रवास पुढेही निरंतर सुरु राहणार आहे.

**वैविध्यपूर्ण क्षेत्रांचा समावेश**

या चळवळीने कोणत्याही एका क्षेत्रापुरते स्वतःला मर्यादित ठेवलेले नाही. यात साहित्य व कला (साहित्यिक, चित्रपट कलाकार, नाट्यकर्मी, चित्रकार), विज्ञान व प्रशासन (शास्त्रज्ञ, प्रशासकीय अधिकारी), समाजकारण व राजकारण (स्वातंत्र्यसैनिक, लोकप्रतिनिधी, समाजसेवक), क्रीडा व इतर (खेळाडू, जागतिक विक्रमवीर, सुलेखन आणि धार्मिक क्षेत्रातील व्यक्ती) यांचा प्रामुख्याने समावेश आहे.

**प्रदर्शने : एक फिरते विद्यापीठ**

अक्षरोत्सव संग्रहाची प्रदर्शने म्हणजे ज्ञानाचा खजिनाच असतो. राज्याच्या विविध जिल्ह्यांत, शाळा-महाविद्यालयांत भरलेली ही प्रदर्शने पाहून अनेक मान्यवरांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. ही प्रदर्शने केवळ पाहण्यासाठी नसून, त्यातून विद्यार्थ्यांना आपली संस्कृती किती प्रगल्भ आहे, याची जाणीव करून दिली जाते.महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यात अशी २५ प्रदर्शने भरविण्यात आलेली आहेत.

**तळेरे ते जागतिक क्षितिज : एक जिद्दीचा प्रवास**

एका बाजूला ५ हजारहून अधिक व्यक्तींना १० हजार वेळा पत्रे पाठवण्याचा संयम आणि दुसरीकडे त्यातून निर्माण झालेली पत्रमैत्री. ग्रामीण भागात राहूनही केवळ पत्रांच्या जोरावर जगभरातील नामवंतांशी संवाद साधता येतो, हे या चळवळीने सिद्ध केलेले आहे. या कार्याची दखल सह्याद्री वाहिनीने थेट प्रक्षेपण असलेल्या 'नमस्कार मंडळी' आणि ' ' या कार्यक्रमातून तसेच आकाशवाणीवर मुलाखतींमधून या प्रतिष्ठित माध्यमांनी वेळोवेळी घेतलेली आहे.

**केवळ प्रदर्शन नाही, तर संस्कार!**

अक्षरोत्सव हे केवळ प्रदर्शनापुरते मर्यादित राहिलेले नाही. महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यातील विविध शाळांमध्ये प्रदर्शने भरवून त्यातून विद्यार्थ्यांशी संवाद साधला जातो. ''छंद का जोपासावा आणि त्याचे आयुष्यातील महत्त्व'' यावर मार्गदर्शन करून नवी पिढी घडवण्याचे कार्य या माध्यमातून सुरू आहे. अक्षरोत्सवच्या राज्यव्यापी प्रदर्शनांतून आजवर हजारो विद्यार्थ्यांनी अनमोल विचार, साहित्य आणि अक्षरांचे सौंदर्य अनुभवले आहे. दुर्मिळ हस्तलिखिते, सुलेखनाची किमया आणि आपल्या मातीतील लोककलांचा हा खजिना पाहून अनेक मान्यवरांनीही थक्क होऊन या उपक्रमाचे कौतुक केले आहे.

पत्रातील अक्षरे ही केवळ शाई नसते, तर ती त्या व्यक्तीच्या विचारांचे प्रतिबिंब असते. मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने, अक्षरोत्सव ही चळवळ आपल्याला पुन्हा एकदा आपल्या मुळाकडे, म्हणजेच संवाद आणि अक्षरांकडे घेऊन जाते. या अनोख्या छंदाला आणि त्यातून उभ्या राहिलेल्या या ज्ञानयज्ञाला सलाम!

निकेत पावसकर यांनी अत्यंत मेहनतीने अक्षरोत्सव नावाचा आगळावेगळा संग्रह जमवला आहे. हा संग्रह केवळ स्वक्षर्यांचा नसून तर या संग्रहात हस्ताक्षरातील विचारांचे समृध्द दालन (दिग्गज साहित्यिक,कवी आणि विचारवंतांच्या हस्ताक्षरांचे दुर्मिळ नमुने, विचार), सुलेखन ()(अक्षरांना कलेचे रूप देणारे विविध सुलेखन प्रकार), सांस्कृतिक ठेवा (महाराष्ट्रातील लोककला, सण-उत्सव आणि ऐतिहासिक संदर्भांची माहिती देणारी साधने), दुर्मिळ हस्ताक्षरे आणि विचार (ज्यांच्या साहित्याने मराठी भाषा समृद्ध झाली, अशा अनेक मान्यवरांचा वैचारिक खजिना) अनुभवण्यास मिळतो.

''अक्षरोत्सव हा केवळ उपक्रम नसून मराठी भाषेच्या संवर्धनासाठी सुरू असलेला एक यज्ञ आहे. मुलांच्या हाताला अक्षराची गोडी लागणे, हेच भाषेचे खरे यश आहे.'' असे गौरोदगार अनेक मान्यवरांनी काढलेले आहेत. तर गेली ४ वर्षे शालेय मुलांना लेखनाची आवड निर्माण व्हावी, त्यातूनच सामाजिकता जोपासली जावी यासाठी सिंधुदुर्ग जिल्हास्तरीय सुंदर हस्ताक्षर स्पर्धा आयोजित केली जाते. यात्साठी सामाजिक विषयावरील मजकूर विद्यार्थ्यांना लेखनासाठी देऊन दुहेरी हेतू साधण्याचा प्रयत्न सुरु आहे.

**अक्षरघराला यांनी दिली भेट**

तळेरे येथील अनोखी संकल्पना असलेल्या अक्षरघराला विविध क्षेत्रातील व्यक्तींनी भेट देऊन प्रशंसा केली आहे. ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉ. सुनिलकुमार लवटे, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू सुहास पेडणेकर, आंतरराष्ट्रीय महिला क्रिकेटपटू पूनम राऊत, फुटबॉल खेळाडू जयेश राणे, प्रसिध्द नाट्य समिक्षक अरुण घाडिगावकर, अभिनेते, दिग्दर्शक संजय खापरे, दिग्दर्शक दिपक कदम, गझलकार मधुसूदन नानिवडेकर, कवी गीतकार प्रसाद कुलकर्णी, साहित्यिक, कथाकथनकार वृंदा कान्बळी, आंतरर्ष्ट्रीय पंच अशोक दाभोलकर, शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या नेमबाज रोहिणी हवालदार, कवी प्रा. प्रदिप पाटिल, ज्येष्ठ विचारवंत वैजनाथ महाजन, लेखक रविप्रकाश कुलकर्णी, समीक्षक प्रसाद घाणेकर, आंतरराष्ट्रीय कामगार नेते विद्याधर राणे, महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधीचे संस्थापक अध्यक्ष रवींद्र बेडकिहाळ, अभिनेत्री प्राजक्ता वाडये, इस्लामपुरचे डीवायएसपी कृष्णात पिंगळे, चित्रकार राज शिंगे, सुप्रसिध्द चित्रकार प्रकाश कब्रे, पर्यावरण अभ्यासक- लेखक धीरज वाटेकर, घुंगुरकाठीचे संस्थापक सतिश आणि सौ. सई लळीत, माजी राज्यपालांचे सहसचिव प्रा. विनायक दळवी, हास्यसम्राट फेम अभिजित कोष्टी, उपविभागीय तथा प्रांताधिकारी वैशाली राजमाने यांच्यासारख्या अनेक व्यक्तींनी भेट देऊन अक्षरघराचे कौतुक केले आहे.

**या परदेशी व्यक्तींची पत्रे संग्रहात**

निकेतच्या या संग्रहामध्ये जागतिक किर्तिचा खेळाडू, टेनिसच्या इतिहासातील सर्वोत्तम खेळाडू रॉजर फेडरर (स्वित्झर्लंड), मुहम्मद युनुस (बांग्लादेश), आयर्लंड देशाचे पंतप्रधान डॉ. लिओ वराडकर, युरोपियन सेन्ट्रल बँकेचे चेअरमन मारिओ ड्राघी (जर्मनी), हॉलीवूड निर्माता अभिनेता दिग्दर्शक सर मायकेल केन (लंडन), अभिनेता जॅकी चेन, अमेरिकन मॉडेल आणि अभिनेत्री कॅरोल अल्ट, मॉडेल-अभिनेत्री-गायिका-नृत्यांगना आणि प्राणीमित्र ब्रिगेट बार्दोत (पॅरीस), वेस्टर्न ऑस्ट्रेलियाचे प्रिमीयर मार्क मॅकगोवन, सुप्रसिध्द टेनिस खेळाडू स्टेफी ग्राफ, नोबेल पुरस्कार विजेते अर्थशास्त्रज्ञ डॉ. अभिजित बॅनर्जी (अमेरिका) यासह अनेक परदेशी व्यक्तींच्या पत्रांचा समावेश आहे.

**या मान्यवरांनी केले कौतुक**

यापूर्वी बेळगाव, मुंबई, कोल्हापूर, नाशिक, चिपळूणसह रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विविध माध्यमिक शाळा, वाचनालये आणि इतर कार्यक्रमानिमित्त मिळून २५ प्रदर्शने झाली असून त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळालेला आहे. यावेळी विविध मान्यवरांनी या संग्रहाचे कौतुक केले असून विविध ठिकाणी नामवंत व्यक्तींनी प्रदर्शनाला भेटही दिलेली आहे. सुप्रसिद्ध चित्रकार प्रकाश कब्रे, अभिनेते माधव अभ्यंकर, पद्मश्री परशुराम गंगावणे, प्रसिध्द कवी महेश केळुसकर, गायक नंदेश उमप, मल्लखांब खेळाडू हिमानी परब, फुटबॉल खेळाडू जयेश राणे, किट्टू म्याकल, कबड्डी खेळाडू - प्रशिक्षक मेघाली आणि सचिन म्हसकर, अभिनेते शेखर फडके, नगरसेवक प्रकाश गंगाधरे, ढोलकी वादक विजय चव्हाण, आमदार बाळा नर, कवी गीतकार प्रसाद




कुलकर्णी, बाल मुकुंद पत्की, पालकमंत्री तथा मत्स्योद्योग मंत्री नितेश राणे, मराठी वृत्तपत्र लेखक संघाचे रवींद्र मालुसरे, ज्येष्ठ लोककला अभ्यासक - नृत्य दिग्दर्शक सदानंद राणे, चित्रकार किशोर नादावडेकर, लेखक जोसेफ तुस्कानो, ज्येष्ठ शाहीर मधू खामकर, लेखक - अभिनेते निनाद शेट्ये, नाट्य समीक्षक अरुण घाडीगावकर, हास्यसम्राट अजितकुमार कोष्टी, कवी सतीश मोघे, कोकणी महोत्सवाचे संयोजक संजय धुरत, सुलेखनकार श्रीकांत गवंडे, अभिनेते शशिकांत खानविलकर, संपादक प्रमोद कोनकर, संपादक राजेंद्रप्रसाद मसुरकर, प्रसिद्ध सतार वादक विदुर महाजन, लेखिका डॉ. अपर्णा महाजन, आंतरराष्ट्रीय व्यंगचित्रकार प्रभाकर वाईरकर, कवी अजय कांडर आदी मान्यवरांनी या संग्रहाची पाहणी करून कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना संदेश पत्र संग्राहक म्हणाले की, हा संग्रह केवळ पाहण्याचा नाही, ऐकण्याचा नाही. तर तो प्रत्यक्ष वाचून अनुभवण्याचा संग्रह आहे. यातून शालेय मुलांच्या मनात जिद्द निर्माण करणारी ऊर्जा मिळते. हे अक्षरांचे मोती आपल्या पुढच्या पिढीसाठी मार्गदर्शक आणि गुरूची भूमिका बजावत आहेत. मुलांनी या विचारांतून बोध घ्यावा आणि आपल्या यशस्वी आयुष्यासाठी नवी वाट चोखाळावी, हाच आमचा प्रामाणिक उद्देश आहे. अशा महान व्यक्तींचे विचार मुलांपर्यंत पोहोचवणे ही काळाची गरज आहे. ही अक्षरे त्यांना केवळ परीक्षेसाठी नाही, तर आयुष्याच्या परीक्षेत यशस्वी होण्यासाठी बळ देतील, असा विश्वास वाटतो.

**मराठी भाषा गौरव दिनी एक संकल्प**

आज जेव्हा आपण कुसुमाग्रजांच्या जन्मदिनी मराठी भाषा गौरव दिन साजरा करत आहोत, तेव्हा अक्षरोत्सव सारख्या चळवळींचे महत्त्व अधोरेखित होते. भाषेचा केवळ उदोउदो करण्यापेक्षा, तिला कृतीतून जपण्याचे काम हा संग्रह करत आहे. २० वर्षांचा हा अविरत प्रवास मराठी भाषेच्या उज्ज्वल भविष्याची ग्वाही देतो.अक्षरोत्सव हा उपक्रम महाराष्ट्राच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील एक दीपस्तंभ आहे. या चळवळीने जोपासलेला हा अक्षरांचा वारसा येणाऱ्या अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील.अक्षरांचा हा उत्सव असाच अखंड सुरू राहो आणि यातून साहित्याची नवी पिढी घडत राहो. कुसुमाग्रजांच्या जन्मदिनी आपण मराठी भाषेचा गौरव करतो. खरा गौरव हा केवळ घोषणांत नसून तो भाषेच्या संवर्धनात असतो. अक्षरोत्सव ही चळवळ मराठी भाषेची मुळे घट्ट करण्याचे काम करत आहे. नवी पिढी जेव्हा मराठी साहित्याकडे आनंदाने वळते, तेव्हाच खऱ्या अर्थाने मराठी भाषा अभिजात ठरते. कुसुमाग्रजांच्या जन्मदिनी आपण मराठी भाषेचा अभिमान बाळगत असताना, निकेत पावसकर यांच्यासारखे व्यक्तिमत्व प्रत्यक्षात भाषेसाठी काम करत असते. अक्षरोत्सव ही चळवळ मराठी भाषेचा डोलारा नव्या पिढीच्या खांद्यावर समर्थपणे पेलण्यासाठी सज्ज करत आहे.

**याबाबत संपर्कासाठी :**
**– श्री निकेत नरहरी पावसकर,**
प्रमुख अक्षरोत्सव परिवार, तळेरे
मु. पो. तळेरे, ता. कणकवली,
जि. सिंधुदुर्ग. ४१६८०१

***

# श्री गुरु तेग बहादुर साहेबजी : धर्मस्वातंत्र्यासाठी बलिदान देणारे महान गुरु

भारताच्या इतिहासात अनेक संत, महात्मे आणि क्रांतिकारकांनी आपल्या विचारांनी व कार्यांनी समाजाला नवी दिशा दिली. त्यापैकी शीख धर्माचे नववे गुरु गुरु तेग बहादुर यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. त्यांनी धर्मस्वातंत्र्य, मानवता आणि सहिष्णुतेसाठी आपल्या प्राणांचे बलिदान दिले. म्हणूनच त्यांना हिंद दी चादर (हिंदुस्थानचे रक्षण करणारी ढाल) असेही संबोधले जाते. त्यांचे जीवनकार्य हे केवळ शीख समाजापुरते मर्यादित नसून संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे.

**जन्म आणि बालपण**

गुरु तेग बहादुर यांचा जन्म १ एप्रिल १६२१ रोजी अमृतसर येथे झाला. त्यांचे वडील गुरु हरगोबिंद हे शीख धर्माचे सहावे गुरु होते. बालपणी त्यांचे नाव त्यागमल असे होते. लहान वयातच त्यांनी शौर्य, संयम आणि आध्यात्मिकतेची चिन्हे दाखवली. वडिलांकडून त्यांनी शस्त्रविद्या आणि धर्मज्ञान यांचे शिक्षण घेतले.

एकदा मुघल सैन्याविरुद्ध झालेल्या युद्धात त्यांनी पराक्रम गाजवला. त्यांच्या शौर्यामुळे त्यांना तेग बहादुर (तेग म्हणजे तलवार, बहादुर म्हणजे शूर) हे नाव देण्यात आले. पुढे ते याच नावाने ओळखले जाऊ लागले.

**आध्यात्मिक साधना आणि समाजकार्य**

गुरु तेग बहादुर यांनी आयुष्यातील अनेक वर्षे ध्यान, साधना आणि समाजसेवेसाठी अर्पण केली. त्यांनी पंजाब, बिहार, आसाम आणि बंगाल अशा विविध प्रदेशांत प्रवास करून लोकांना सत्य, प्रेम आणि सहिष्णुतेचा संदेश दिला. त्यांनी अंधश्रद्धा, अन्याय आणि अत्याचाराविरुद्ध आवाज उठवला.

त्यांच्या शिकवणीत नम्रता, संयम, परोपकार आणि ईश्वरभक्ती यांना विशेष महत्त्व होते. त्यांनी लोकांना सांगितले की खरा धर्म हा मानवतेची सेवा करण्यात आहे. त्यांचे अनेक विचार गुरु ग्रंथ साहिब मध्ये समाविष्ट आहेत. त्यांच्या रचनांमध्ये वैराग्य, निडरता आणि आत्मबल यांचे सुंदर वर्णन आढळते.

**आनंदपूर साहिबची स्थापना**

गुरु तेग बहादुर यांनी पंजाबमध्ये आनंदपूर साहिब या शहराची स्थापना केली. हे ठिकाण पुढे शीख धर्माचे एक महत्त्वाचे केंद्र बनले. येथे त्यांनी धर्मप्रसार आणि समाजरचना यांचे कार्य केले. आनंदपूर साहिब आजही शीख समुदायासाठी अत्यंत पवित्र स्थान मानले जाते.

**मुघल काळ आणि धार्मिक अत्याचार**

त्या काळात भारतावर



मुघलाचे याचे राज्य होते. त्यांच्या कारकीर्दीत धार्मिक असहिष्णुता वाढली होती. जबरदस्तीने धर्मांतर घडवून आणण्याचे प्रकार सुरू होते. विशेषतः काश्मीरमधील हिंदूंवर मोठ्या प्रमाणावर अत्याचार होत होते.काश्मिरी पंडितांनी या अन्यायाविरुद्ध मदतीसाठी गुरु तेग बहादुर यांच्याकडे धाव घेतली. त्यांनी त्यांना संरक्षण देण्याचे आश्वासन दिले.

गुरुजींनी स्पष्ट सांगितले की जर त्यांना इस्लाम स्वीकारायला भाग पाडले जात असेल, तर आधी मला धर्मांतर करावे लागेल. त्यांच्या या ठाम भूमिकेमुळे ते मुघलांच्या रोषाला सामोरे गेले.

**बलिदान**

गुरु तेग बहादुर यांना अटक करून दिल्ली येथे आणण्यात आले. त्यांच्यावर इस्लाम स्वीकारण्याचा दबाव टाकण्यात आला; परंतु त्यांनी धर्मांतरास नकार दिला. शेवटी ११ नोव्हेंबर १६७५ रोजी त्यांची हत्या करण्यात आली.

त्यांचे बलिदान मानवतेच्या इतिहासातील एक महान घटना मानली जाते. त्यांनी स्वतःच्या धर्मासाठी नव्हे, तर इतरांच्या धर्मस्वातंत्र्यासाठी प्राण दिले. त्यामुळे त्यांना ''हिंद की चादर'' ही उपाधी मिळाली.

ज्या ठिकाणी त्यांचे शिर छाटण्यात आले, त्या ठिकाणी आज गुरुद्वारा शीश गंज साहिब उभा आहे. हे स्थान त्यांच्या बलिदानाची साक्ष देत आजही लाखो भाविकांना प्रेरणा देते.

**गुरु गोविंदसिंहांवर प्रभाव**

गुरु तेग बहादुर यांचे सुपुत्र गुरु गोविंदसिंह पुढे शीख धर्माचे दहावे गुरु झाले. वडिलांच्या बलिदानाचा त्यांच्यावर खोल परिणाम झाला. पुढे त्यांनी खालसा पंथाची स्थापना करून शीख धर्म अधिक संघटित व बळकट केला. गुरु तेग बहादुर यांच्या शिकवणीमुळेच शीख समाजात निडरता आणि त्यागभाव दृढ झाला.

**शिकवण आणि विचार**

गुरु तेग बहादुर यांच्या शिकवणीचा मुख्य गाभा म्हणजे

सत्याचा मार्ग कधीही सोडू नका.

अन्यायाविरुद्ध ठाम उभे रहा. सर्व धर्मांचा आदर करा.

ईश्वरभक्ती आणि मानवसेवा यांचा संगम साधा.

त्यांच्या रचनांमध्ये जीवनाचे क्षणभंगुर स्वरूप आणि आत्मिक शांतीचा संदेश आहे. त्यांनी माणसाला भयमुक्त आणि आत्मनिर्भर बनण्याचा उपदेश केला.

गुरु तेग बहादुर यांचे जीवन हे त्याग, शौर्य आणि मानवतेचे प्रतीक आहे. त्यांनी धर्मस्वातंत्र्याच्या रक्षणासाठी स्वतःचा बळी दिला, परंतु आपल्या तत्त्वांशी कधीही तडजोड केली नाही. त्यांचे कार्य आणि बलिदान भारतीय इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे.

आजच्या काळातही श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या विचारांची गरज अधिक आहे. धार्मिक सहिष्णुता, परस्पर आदर आणि मानवतेची भावना जपणे हीच त्यांच्या प्रति खरी श्रद्धांजली ठरेल. श्री गुरु तेग बहादुर यांचे जीवन आपल्याला शिकवते की सत्य आणि न्यायासाठी लढताना कितीही संकटे आली तरी धैर्य सोडू नये.

त्यांचे बलिदान हे केवळ एका धर्माचे नव्हे, तर संपूर्ण मानवजातीच्या स्वातंत्र्याचे प्रतिक आहे. म्हणूनच ते भारतीय इतिहासातील एक अजरामर आणि तेजस्वी व्यक्तिमत्त्व म्हणून सदैव स्मरणात राहतील.

श्री गुरु तेग बहादुर साहेबजी यांचा त्याग, त्यांची अध्यात्मिक साधना आणि समाज कार्य, बलिदान, शिकवण आणि विचार समाजात रुजावेत यासाठी त्यांच्या ३५० व्या शहीदी समागमाचे आयोजन प्रथम नागपूरला नंतर नांदेड येथे झाले. आता दि. २८ फेब्रुवारी व १ मार्चला नवी मुंबई येथील ओवे मैदान, सेक्टर २९, खारघर येथे होत आहे. या समागमामध्ये देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रिय गृहमंत्री अमित शहा, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक राज्यांचे मुख्यमंत्री, मंत्री महोदय, महनिय व्यक्ती उपस्थित राहणार आहेत. आपणही या शहीदी समागमामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र शासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

**– रणजित पवार,**
उपसंपादक,
विभागीय माहिती
कार्यालय, कोल्हापूर

# ग्रंथ वाचनातूनच समाजाची खरी प्रगती–ज्येष्ठ साहित्यिक श्रीकांत देशमुख

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** समाजातील वाढत्या समस्या, असमानता आणि विचारांतील गोंधळ यावर प्रभावी उपाय म्हणजे ग्रंथ वाचन व विचारांची चिकित्सा होय. प्रत्येकाने दरवर्षी किमान काही रकमेची पुस्तके खरेदी करून वाचनाची सवय लावली पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक श्रीकांत देशमुख यांनी केले.

येथील कै. रं.रा. बियाणी नूतन साहित्य मंदिर वाचनालयात आयोजित हिंगोली ग्रंथोत्सव–२०२५ चे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता होते. याप्रसंगी व्यासपीठावर प्रा. विलास वैद्य, प्रा. खंडेराव सरनाईक, अशोक अर्धापूरकर, सहायक ग्रंथालय संचालक सुनील हुसे, विभागीय ग्रंथालयाचे जिल्हा ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव, जिल्हा ग्रंथालय अधिकारी आशिष ढोक, सहायक माहिती अधिकारी चंद्रकांत कारभारी आदी उपस्थित होते.

यावेळी श्रीकांत देशमुख यांनी सांगितले की, लोकसंख्या वाढत असताना माणुसकी कमी होत चालली आहे, ही चिंतेची बाब आहे. इतिहासातील महात्मा ज्योतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत तुकाराम आणि छत्रपती शिवाजी महाराज यांसारख्या महान व्यक्तींच्या विचारांचा अंगीकार केल्यास समाज अधिक सक्षम होऊ शकतो. वाचनामुळे विवेक, प्रश्न विचारण्याची क्षमता आणि सामाजिक जाण विकसित होते, असे त्यांनी नमूद केले. प्रत्येक घरात लहानसे ग्रंथालय असावे, असे आवाहनही त्यांनी केले.

**वाचनातून व्यक्तिमत्त्व विकास–जिल्हाधिकारी राहुल गुप्ता**

अध्यक्षीय भाषणात राहुल गुप्ता यांनी विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तकांसोबत विविध साहित्याचे वाचन करावे, असे आवाहन केले. दर महिन्याला किमान एक पुस्तक वाचण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी करावा, असे ते म्हणाले. वाचनामुळे विचारांमध्ये व्यापकता येते आणि योग्य निर्णयक्षमता विकसित होते. स्पर्धा परीक्षांसाठीही वाचन अत्यंत उपयुक्त ठरते, असे त्यांनी स्पष्ट केले.

**ग्रंथोत्सव ही वैचारिक चळवळ–प्रा.विलास वैद्य**

ग्रंथोत्सव हा केवळ साहित्यिक कार्यक्रम नसून हिंगोलीची वैचारिक परंपरा जपणारी चळवळ असल्याचे प्रा. विलास वैद्य यांनी सांगितले. साहित्य वाचनामुळे संवेदनशीलता व विचारांची परिपक्वता वाढते, त्यामुळे प्रत्येकाने वाचनाकडे वळावे, असे त्यांनी नमूद केले.

प्रास्ताविकात जिल्हा ग्रंथालय अधिकारी आशिष ढोक यांनी ग्रंथोत्सवाच्या आयोजनामागील उद्देश स्पष्ट केला. यामध्ये परिसंवाद, व्याख्याने, कवी संमेलन आदी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून नागरिकांनी या ज्ञानोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. यंदा साहित्यिकांचा सत्कार, कोडद्वारे सभासद नोंदणी आणि अभिप्राय संकलन उपक्रम राबविण्यात आला आहे.

ग्रंथालय सहायक संचालक सुनिल हुसे यांनी हिंगोली जिल्हा हा समृद्ध जिल्हा असून अभिप्राय संकलन पेटी व क्यूआर कोडचा वापर करणारा हिंगोली जिल्हा पहिला ठरला आहे. संत गाडगेबाबा व बहिणाबाईची शिकवण ग्रंथातून मिळणार आहे. त्यामुळे सर्वांनी ग्रंथ वाचले पाहिजेत. ग्रंथातून आनंद मिळतो. त्यामुळे सर्वांनी ग्रंथोत्सवाचा लाभ घ्यावा व येथे उभारण्यात आलेल्या पुस्तकांच्या स्टॉलला भेटी देऊन पुस्तके खरेदी करावीत. प्रत्येकांनी किमान एक तरी पुस्तक खरेदी करुन घर समृद्ध करावे, असे आवाहन केले. यावेळी प्रा. खंडेराव सरनाईक यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. नामदेव दळवी व गजानन शिंदे यांनी केले, तर सर्व उपस्थितांचे प्रा. विलास खरात यांनी मानले. यावेळी संगीता चौधरी लिखित रंग जीवनाचे या पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. गंगादेवी देवडा अंध विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर केले. या कार्यक्रमात साहित्यिक व ग्रंथदिंडीमध्ये सहभाग घेतलेल्या शाळांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमास जिल्ह्यातील सार्वजनिक वाचनालयाचे प्रतिनिधी, ग्रंथपाल, पत्रकार, शिक्षक, विद्यार्थी, महिला, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**ग्रंथोत्सवानिमित्त आयोजित ग्रंथदिंडीला उस्फूर्त प्रतिसाद**

ग्रंथोत्सवानिमित्त आज सकाळी येथील कै. रं.रा. बियाणी नूतन साहित्य मंदिर वाचनालयापासून ते जुनी नगर परिषद येथून ग्रंथोत्सव कार्यक्रमाच्या ठिकाणापर्यंत ग्रंथदिडी काढण्यात आली. या ग्रंथदिंडीचे उद्घाटन नगरसेवक श्रीराम बांगर यांच्या हस्ते ग्रंथाचे पूजन करुन करण्यात आले. या ग्रंथदिंडीला शालेय विद्यार्थी, नागरिकांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. या ग्रंथदिंडीमध्ये सरजूदेवी भिकूलाल भारुका आर्य कन्या विद्यालय, माणिक स्मारक आर्य विद्यालय, विद्यानिकेतन इंग्लिश स्कूल, सत्यनारायण विद्यामंदिर, गुरुदास काम माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या ग्रंथदिंडीमध्ये विद्यार्थ्यांनी अत्यंत सुदर असे वेशभूषा, लेझीम नृत्य सादर केले.

या ग्रंथोत्सवामध्ये शासकीय ग्रंथागार छत्रपती संभाजीनगर, संविधान जागर अभियान ग्रंथ विक्री, प्रणवी बुक सेंटर, सम्राट बुक स्टॉल, प्रगती बुक स्टॉल, श्री गणेश बुक डेपो यासह विविध पुस्तकाचे स्टॉल लावण्यात आले आहेत. यावेळी शासकीय ग्रंथ भांडाराचेही मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. तसेच मान्यवरांनी येथे लावलेल्या ग्रंथ स्टॉल भेटी देवून ग्रंथांची पाहणी केली.



## सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंतापदी सुदेश देशमुख यांनी पदभार घेतल्याबद्दल गुत्तेदार संघटनेच्या वतीने सत्कार

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** सार्वजनिक बांधकाम विभाग हिंगोली च्या कार्यकारी अभियंता पदी सुदेश देशमुख यांनी पदभार स्वीकारला आहे. त्यानंतर देशमुख यांचा सत्कार गुत्तेदार संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला यावेळी शासकीय गुत्तेदार मयुर कयाल, एक. आर.खान, संतोष बांगर, मयुर राठोड, भाटिया यांच्यासह इतरांची उपस्थिती होती.

## हिंगोली जिल्ह्यातील वसमत शहरातील ऐतिहासिक तलाव दुरुस्ती कामामध्ये भुयारात खजाना सापडल्याची अफवा नागरिकांची गर्दी

**आत्ताच एक्सप्रेस**



**हिंगोली–** ऐतिहासिक तलावाच्या दुरुस्तीचे काम सुरू असताना जमिनीखाली एक प्राचीन भुयार आढळून आले आहे. या घटनेमुळे शहरात उत्सुकता आणि तर्कवितर्कांना उधाण आले असून नागरिकांची मोठी गर्दी तलाव परिसरात जमली आहे.

**कसे सापडले भुयार?**

तीन वर्षांपूर्वी अतिवृष्टीमुळे वसमतचा हा तलाव फुटला होता. त्यात शहराचे मोठे नुकसान झाले होते. त्यानंतर तलाव दुरुस्तीसाठी निधी मंजूर झाला असून सध्या काम प्रगतिपथावर आहे. गुरुवारी संरक्षण भिंतीसाठी जेसीबीने खोदकाम सुरू असताना जमिनीखाली दगड आणि चुन्याने बांधलेले एक मजबूत भुयार उघड झाले. खोदकामात या भुयाराचा काही भाग क्षतिग्रस्त झाला असला तरी उर्वरित बांधकाम पाहून हा जुन्या काळातील स्थापत्यकलेचा उत्तम नमुना असल्याचे जाणकारांचे मत आहे.

**गुप्तधनाच्या चर्चेला उधाण**

वसमत शहराला मोठा ऐतिहासिक वारसा लाभलेला असल्याने हे भुयार नेमके कुठे जाते, ते तत्कालीन पाणीपुरवठा यंत्रणेचा भाग आहे की युद्धकाळातील गुप्त मार्ग आहे, याबाबत नागरिकांमध्ये विविध चर्चा रंगल्या आहेत. या भुयारात गुप्तधन असल्याचीही चर्चा जोर धरत आहे. ही बातमी वाऱ्यासारखी शहरभर पसरताच भुयार पाहण्यासाठी नागरिकांनी तलाव परिसरात एकच गर्दी केली.

**पुरातत्त्व विभागाची तपासणी आवश्यक**

हे भुयार नेमके कोणत्या काळातील आहे आणि त्याचे ऐतिहासिक महत्त्व काय, हे पुरातत्त्व विभागाच्या तपासणीनंतरच स्पष्ट होऊ शकेल. तोपर्यंत या भुयाराची सुरक्षा राखणे आणि दुरुस्तीच्या कामाचे नियोजन करणे हे प्रशासनासमोर मोठे आव्हान असेल. माजी नगराध्यक्ष खलील अहमद सौदागर यांनी या भुयारावर तज्ज्ञांनी प्रकाश टाकणे गरजेचे असल्याचे सांगितले.

## बंद पडलेली रोजी रोटी पुन्हा सुरु झाल्याने सोनाराच्या डोळयातुन तरळले आनंदाश्रु

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** सोनार नामे सुरेश संभाजी खंदारकर, वय ३७ वर्ष, रा. लोणार, जि. बुलढाणा यांनी विविध बँका कडुन तसेच बचत गटातुन छोटी-छोटी रक्कम लोन स्वरूपात व हात उसणे घेवुन मागील पाच वर्षापुर्वी २० ग्रॅम सोने व काही चांदीचे दागिने खरेदी करून मौजे रायवाडी व मौजे कापडसींगी येथे मासिक १०००/- रू भाडयाने खोली घेवुन छोटेसे सोन्या चांदीचे दुकान चालवुन आपली उपजिवीका भागवत होते. त्यांनी दि.३०.०१.२०२६ रोजी मौजे कापडींगी येथील दुकानावर दोन तास व्यापार करून सायंकाळी चार वाजण्याचे सुमारास दुकानातील सोन्याचांदीचे दागिने घेवुन त्यांचे मोटार सायकलने लोणारकडे जात असतांना एका मोटार सायकलवर अनोळखी तिन इसमांनी सोनाराचा पाठलाग करून मोटार सायकल खाली पाडुन सोनारास चाकुचा धाक दाखवुन





सोनारा जवळील आतापर्यंत कमवलेले ११४ ग्रॅम सोने व ३६०० ग्रॅम चांदीचे दागीने, मोबाईल, रोख रक्कम असा ३० लाखाचा मुद्देमाल बळजबरीने लुटल्यासंदर्भाने पो.स्टे. सेनगाव गुरनं. ३९/२०२६ कलम ३०९ (६), ३५१ (२) भा.न्या.सं. प्रमाणे दाखल होता. मागील पाच वर्षाची मेहनतीची कमाई एका क्षणात लुटुन दररोजची रोजी रोटी दुकान बंद पडल्याने फिर्यादी सोनार हताश झाला होता.

सदर गुन्हयासंदर्भाने जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन, अपर पोलीस अधीक्षक कमलेश मिना, राजकुमार केंद्रे उपविभागीय पोलीस अधिकारी हिंगोली ग्रामीण यांनी घटनास्थळी तात्काळ भेट देवुन सदर गुन्हयाचा छडा लावण्याबाबत पोलीस निरीक्षक मोहन भोसले, स्थानिक गुन्हे शाखा, हिंगोली व सपोनि. पो. स्टे. सेनगाव यांना सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने सपोनि. शिवसांब घेवारे, पोउपनि. दिलीप मोरे, स्था.गु.शा. व सपोनि. दिपक मस्के, पोउपनि. रविकिरण खंदारे, पो.स्टे. सेनगाव यांचे पथक समांतर तपास करून अवघ्या ४८ तासात सदर गुन्हयाचा उलघडा करून सहा दरोडेखारास ताब्यात घेवुन चोरी गेलेला संपुर्ण मुददेमाल जप्त करण्यात आला.

तसेच सदर दरोडेखोराकडुन जप्त केलेला मुददेमाल हे कायदेशीर प्रक्रीया लवकरात लवकर पुर्ण करून फिर्यादीस परत देवुन फिर्यादीचे बंद पडलेले दुकान हे पुन्हा लवकरात लवकर चालु होईल या अनुषंगाने पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन हे तपास पथकास सुचना देत होते त्याअनुषंगाने दि २७.०२.२०२६ रोजी फिर्यादीस अगदी कमी कालावधीत फिर्यादीस दरोडेखोरांनी लुटलेला संपुर्ण ३० लाखाचा मुददेमाल परत करून त्यांना पुन्हा व्यापार करण्यासाठी हिंगोली पोलीसांकडून शुभेच्छा देण्यात आल्या.

सदर मुददेमाल ताब्यात घेवुन पुन्हा एक महिन्याच्या आत बंद पडलेले सोन्याचांदीचे दुकान पुन्हा सुरू केल्याने सोनाराच्या डोळयात आनंदाश्रु तरळले व तोंडातुन धन्यवाद निघाले.



## हिंगोली येथे पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान अंतर्गत कार्यशाळा

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** हिंगोली येथे पंडित दिनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान अंतर्गत कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी भारतीय जनता पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष संजय कौडगे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, हिंगोली विधानसभेचे आमदार तानाजीराव मुटकुळे पाटील, आदींची प्रमुख उपस्थिती होती.

## राजे संभाजी कनिष्ठ महाविद्यालयात राजभाषा मराठी दिवस साजरा करण्यात आला



**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली –** स्मृतीशेष अँड.ग्यानबारावजी शिरसाट सेवाभावी संस्थेचे. राजे संभाजी कनिष्ठ महाविद्यालय हिंगोली येथे दिनांक २७ फेब्रुवारी रोजी मराठी साहित्याचे श्रेष्ठ कवी कुसुमाग्रज (वि. वा. शिरवाडकर ) यांची जयंती साजरी करण्यात आली.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य उमेश शेळके यांनी प्रतिमेला दीप प्रज्वलित करून व पुष्पहारअर्पण करून अभिवादन केले. महाविद्यालयातील प्रा. सौ ज्योती भट मॅडम ,प्रा.संदीप जाधव , राष्ट्रमाता जिजाऊ विद्यानिकेतन चे मुख्याध्यापक सुधाकर बल्लाळ सर व पर्यवेक्षक कानेड , शिवशंकर डोलारे, चाटसे,शिक्षकेतर कर्मचारी शशिकांत बोरकर यांनी प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

## अवैधरीत्या वाळुवाहतुक करणारा टिप्पर व टॅक्टर पोलीसांनी पकडून २१, लाख २० हजार रुपयाचा मुद्देमाल जप्तची कार्यवाही

### अप्पर पोलीस अधिक्षक हिंगोली कमलेश मीना यांचे पथकाची कामगिरी

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** जिल्हयात अवैध वाळु वाहतुकीवर आळा घालण्यासाठी पोलीस अधिक्षक डॉ नीलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष मोहीम राबविण्यात येत आहे त्या अनुषंगाने अप्पर पोलीस अधिक्षक कमलेश मीना यांच्या कार्यालयातील पथकाने प्रभावी कार्यवाही करत पुर्णा व पैनगंगा नदीचे पात्रातुन अवैध वाळु वाहतुक करणारा एक टिप्पर व एक टॅक्टर पकडण्यात आला आहे

सदरची कार्यवाही ही दि. २७/०२/२०२६ रोजी सकाळी ०६:१० वा अपर पोलीस अधिक्षक कार्यालयातील कर्मचारी पोह ६९७/पवार, पोअ ८३९/ टाले, पोअ ८९१/ नरवाडे, पोअ ४४२/ कुटे, यांनी अपर पोलीस अधिक्षक कमलेश मीना यांचे आदेशान्वये जिल्हयात पेट्रोलिंग करीत असतांना केली आहे सदर पथकास प्रॉपर हिंगोली शहरातील नांदेड नाका येथे गुप्त बातमीदार यांच्याकडुन माहीती मिळाली कि एक इसम पिवळया रंगाचे टिपरमध्ये अंदाजे ०२ ब्रास रेतीची अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक करीत असल्याची माहिती मिळाल्याने पथकाने प्रॉपर हिंगोली शहरातील इंदीरागांधी चौक ते पिपल्स बैंक जवळ हिंगोली वाशिम रोडवर जावुन सदरील टिपर चालकास हाताच्या इशाऱ्याने थांबण्याचा इशारा केला असता त्याने सदर ठिकाणी टिप्पर थांबविला त्याचेकडे नावं गांव बाबत विचारपुस केली असता त्यांनी आपले नांव सुरज पांडुरंग कन्हाळे वय २० वर्षे व्यवसाय चालक रा. असोला तर्फे लाख ता औढा ना असे सांगुन त्याचेकडे रेती वाहतुकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्यांनी परवाना नसल्याचे सांगितल्याने त्यास ताब्यात घेवून पोस्टे हिंगोली येथे पथकातील सतिष नरवाडे यांचे तक्रारीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोस्टे. हिंगोली शहर येथील पोह एम ए शेख हे करीत आहेत.

या कार्यवाहीत पोलीसांनी एक पिवळया रंगाचा टिप्पर किंमत १५ लाख रुपये व त्यामध्ये असलेली अंदाजे ०२ ब्रास रेती किमती १० हजार रुपये असा एकुण १५,१०,००० रुपयाचा माल जप्त करण्यात आला.

तसेच दुसरी कार्यवाही पोलीस स्टेशन बांसबा हद्दितील दुरक्षेत्र कन्हेरगांव नाका अंतर्गत मौ. चिंचपुरी गांवाच्या जवळुन वाहणाऱ्या पैनगंगा नदीच्या पात्रातुन अवैधरीत्या रेती एका निळया रंगाच्या टॅक्टर व टॉलीमध्ये काढुन तिची चोरटी विक्री करीत असल्याची माहीती मिळाल्याने नमुद पथकाने सदर ठिकाणी जावुन छापा मारण्याचे तयारीत असतांना सदरील टॅक्टर चालकाने पथकातील पोलीस कर्मचारी हे आपल्याकडे येत असल्याचे पाहुन टॅक्टर सुरु करुन टॅक्टर हा नदीपात्राच्या काढावर आणुन हायडोलीक करून टॅक्टर टाली मधील रेती सांडुन दिली व टॅक्टर हा मौ. चिंचपुरी शेत शिवारातील एका झाडाखाली उभे करुन पळून गेला तेव्हा पथकातील कर्मचारी यांचा परीसरात शोध घेतला परंतु चालक व मालक मिळुन त्यांना न आल्याने त्यांनी सदरचा टॅक्टर व टॉली हि ताब्यात घेवुन खाजगी इसमांच्या मदतीने टॅक्टर व टॉली हि पोलीस ठाणे बासंबा येथे आणुन लावण्यात आली आहे. सदरील टॅक्टरचे अज्ञात चालक मालक यांचे विरुध्द पथकातील संदीप पवार यांच्या तक्रारीवरुन पोलीस स्टेशन बासंबा येथे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास स.पो उपनि. पोले हे करीत आहेत.

सदरील कार्यवाहीत एक निळया रंगाचा टॅक्टर किमती ५ लाख रुपये व निळया रंगाची टॉली किमती १,१०,००० रुपयाची असा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. या दोन्ही कार्यवाहीत वर नमुद प्रमाणे २१ लाख २० हजार रुपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही हि पोलीस अधिक्षक डॉ.निलाभ रोहन, अपर पोलीस अधिक्षक कमलेश मीना यांच्या मार्गदर्शनाखाली पोह ६९७/पवार,



पोअ.८३९/टाले, पोअ. ८९१/ नरवाडे, पोअ. ४४२/ कुटे, यांचे पथकाने केली आहे. जिल्हयात अवैध वाळू उत्खनन व वाहतुक, तसेच अवैदय गुटखा, गांजा, देशी व विदेशी दारू, जुगार, इत्यादी अवैदयधंदे करणा-याविरूध्द भविष्यात अशाच प्रकारची कठोर कार्यवाही सुरू राहतील असा इशारा पोलीस प्रशासनाकडुन देण्यात आला आहे.

**फॉर्म ए.आर.४**
**दैनिक 'आत्ताच एक्सप्रेस' परभणी आवृत्ती प्रकाशनासंबंधीचे**
**नियम ७ नुसार निवेदन**

| | |
|---|---|
| १) प्रकाशन स्थान | : लक्ष्मी ऑफसेट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या जवळ, रेल्वे स्टेशन रोड, परभणी जि.परभणी -४३१४०१ |
| २) प्रकाशन काळ | : दैनिक |
| ३) मुद्रकाचे नांव | : सुग्रीव सोपानराव मुंढे |
| भारतीय नागरिक आहे काय ? | : होय (भारतीय) |
| ४) प्रकाशकाचे नाव | : सुग्रीव सोपानराव मुंढे |
| भारतीय नागरिक आहे काय? | : होय (भारतीय) |
| ५) संपादकाचे नांव | : सुग्रीव सोपानराव मुंढे |
| भारतीय नागरिक आहे काय? | : होय (भारतीय) |
| ६) मालकी | : सुग्रीव सोपानराव मुंढे |
| ७) एकूण भांडवलाच्या एक टक्क्याहून अधिक भाग असलेल्या भागधारकांची नावे व पत्ते | : काही नाही. |

मी, सुग्रीव सोपानराव मुंढे असे जाहिर करतो की, वर दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे आणि समजुतीप्रमाणे सत्य आहे.
दि. १ मार्च २०२६

**सही/-**
**सुग्रीव सोपानराव मुंढे**
**प्रकाशक**

# नगर पंचायत माहूर १०० कोटी रुपयांचा अर्थसंकल्प मंजुर

## माहूर शहर हे तिर्थक्षेत्राला साजेशे शहर बनविणार-नगराध्यक्ष फिरोज दोसानी

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

**श्रीक्षेत्र माहूर –** नगर पंचायत माहूर च्या सभागृहात दि २७/०२/२०२६ रोजी नगराध्यक्ष फिरोज कादर दोसानी यांच्या अध्यक्षतेखाली व मुख्याधिकारी विवेक भारत कांदे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर नारायण लाड यांचे सह सर्व सदस्यांच्या उपस्थितीत संपन्न झालेल्या अर्थसंकल्पीय विशेष सभेत सन २०२६-२७ चा रक्कम रुपये ९९,८४,५२,६८३/-एवढया रक्कमेचा व रक्कम रुपये ८,०९,०६०/- रुपयांचा शिल्लकी अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला.

दि २७/०२/२०२६ रोजी नगर पंचायत माहूरच्या सभागृहात अर्थसंकल्पीय विशेष सभा संपन्न झाली. या सभेत सन २०२६-२७ साठीच्या अर्थसंकल्पाचे सविस्तर वाचन लेखापरिक्षक विशाल मरेवाड यांनी केले. अंदाजपत्रकानुसार नगर पंचायत माहूरला १) दर व करापासुन १,८४,४८,८००/- रुपये, २) विशेष वसुलीतुन ४७,९६,०००/- रुपये, ३) महसुली उत्पन्नातुन ४,०३,१६,१५७/- रुपये, ४) शासनाकडून मिळणा-या अनुदानातुन ८३,७६,६८,४७५/-,५) संकीर्ण वसुलीतुन ८५,५५,८६१/- व ६) दलित वस्ती अनुदान व ईतर यामधुन ८,७८,५८,३३०/-व प्रारंभिक शिल्लक ९,७१,६९९/- रुपये यासह नगर पंचायत माहूरला ९९,८४,५२,६८३/- एवढा निधी अंदाजीत जमा होणे अपेक्षित असल्याची तरतुदी केल्या आहेत. तर नगर पंचायत माहूरने विविध विकास कामासाठी खर्च बाजुला १) सामान्य प्रशासन व वसुली विभागासाठी १,५९,७१,४४३/-, २) सार्वजनिक सुरक्षीतेसाठी ३,३२,४८,५००/-, ३) शहरातील नागरीकांसाठी रस्ते, नाली बांधकामे, सांस्कृतिक सभागृह बांधकामे विविध चौकांचे सुशोभिकरण करणेव ईतर बांधकामे तसेच आरोग्य व सेवा देणेसाठी ८२,३३,९५,९६१/-४) ग्रंथालय विभागासाठी ९४२,७३३/-,५) संकीर्ण कामांसाठी ३,०९,९९,३७८/- तसेच ६) दलित वस्ती भागातील सांस्कृतिक सभागृह कामे व ईतर कामांसाठी ९२९,२२,९७०/- असे एकूण ९९,७४,८०,९८४/- एवढया अपेक्षित खर्च करण्याच्या तरतुदी असलेला व रक्कम रुपये ९,७१,६९९/- एवढया रक्कमेचा शिल्लकी अर्थसंकल्प या सभेत मंजुर करण्यात आला.




सदर अर्थसंकल्पावर सविस्तर चर्चा करण्यात आली. या चर्चेत नगराध्यक्ष फिरोज कादर दोसानी, मुख्याधिकारी विवेक भारत कांदे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर नारायण लाड, विद्यमान सदस्य तथा माजी नगराध्यक्ष राजेंद्र नामदेवराव केशवे, सदस्य तथा कॉग्रेस पक्षाचे गटनेते. विलास बालाजीराव भंडारे, सदस्य तथा शिवसेना पक्षाचे गटनेते श्रीमती. आशाताई निरधारी जाधव, सदस्य भाजपाचे गटनेते सागर सुधीर महामुने, तसेच सभापती श्रीमती नंदा रमेश कांबळे, सभापती विजय शामराव कामटकर, सभापती श्रीमती शीला रणधीर पाटील श्रीमती. सारीका देविदास सिडाम, श्रीमती शकिलाबी शब्बीर सैय्यद, श्रीमती. लतिफा मस्तान शेख, श्रीमती सागर विक्रम राठोड, श्रीमती बिलकीसबेगम अहमंद अली शेख, श्रीमती. कविता राजू सौंदलकर यांनी अर्थसंकल्पावरील चर्चेत सहभाग नोंदविला.

या अर्थसंकल्पा मध्ये विशेष प्राधान्याने विविध महापुरुषांच्या स्मारके विकसीत करणे, तिर्थस्थळांना जाणारे रस्ते विकसीत करणे, विकास योजनेतील रस्ते भुसंपादन करुन विकसीत करणे, मोठ्या नाल्याचे बांधकाम करुन शहरातील पाणी शहराबाहेर काढणे, ओपन स्पेस विकसीत करणे, उद्यान निर्मिती करणे, न.पं. प्रशासकीय इमारत बांधकाम करणे, वाचनालयाचे बांधकाम करणे, असे अनेक विकास कामे करण्याच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. यानंतर नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले आणी चहा-पाना नंतर अर्थसंकल्पीय सभा संपल्याचे जाहीर केले. यावेळी नगर पंचायतचे लेखाविभाग प्रमुख तथा लेखापरिक्षक श्री. विशाल मरेवाड, सभा अधिक्षक श्री. संदिप गजलवाड, रचना अभियंता श्री. रोहित डुकरे, विशाल ढोरे, .. मजहर शेख, सुरेंद्र पांडे, व ईतर कर्मचारी उपस्थित होते.

## हिमायतनगर येथे आज भव्य स्वाभिमानी मातंग परिषद; बोधडी खुर्द सर्कलसह किनवट तालुक्यातील समाज बांधवांना उपस्थित राहण्याचे आवाहन

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

**किनवट –** आज हिमायतनगर (जि. नांदेड) येथील बस स्टँड परिसरात स्वाभिमानी मातंग परिषद सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या ऐतिहासिक परिषदेच्या पार्श्वभूमीवर बोधडी खुर्द सर्कल मधील मातंग समाजाला संघटित करण्यासाठी आणि परिषदेला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्यासाठी बालाजी प्रल्हाद गायकवाड, जीवा गादेकर,आणि सुमित पैले,यांच्या वतीने विशेष आवाहन करण्यात आले आहे.



**प्रबोधनकार सत्यपाल महाराज यांचे मार्गदर्शन**

या परिषदेचे मुख्य आकर्षण प्रसिद्ध प्रबोधनकार सत्यपाल महाराज यांचे समाज प्रबोधनपर मार्गदर्शन हे असणार आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन मा. सचिनभाऊ साठे (डॉ. अण्णाभाऊ साठे यांचे नातू) यांच्या हस्ते होणार असून, मा. गुणवंत काळे (लसाकम सरचिटणीस) हे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषवणार आहेत. प्रमुख वक्ते म्हणून अजिंक्य भैय्या चांदणे (डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया) हे उपस्थित राहून मार्गदर्शन करतील.

**गुणवंत विद्यार्थ्यांचा होणार गौरव**

या परिषदेमध्ये समाजातील शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन देण्यासाठी मागील वर्षात इयत्ता १० वी व १२ वी मध्ये ७५% पेक्षा जास्त गुण मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा ट्रॉफी देऊन विशेष सन्मान केला जाणार आहे. नोंदणीसाठी समाज बांधवांनी संपर्क करण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

**बोधडी खुर्द सर्कलमध्ये जय्यत तयारी**

बोधडी खुर्द सर्कल मध्ये समाज बांधवांच्या गाठीभेटी घेऊन या परिषदेचे महत्त्व पटवून दिले जात आहे. मातंग समाजाच्या न्याय्य हक्कासाठी आणि सामाजिक ऐक्य वृद्धिंगत करण्यासाठी बोधडी खुर्द सर्कलमधील प्रत्येक गावातून समाज बांधवांनी मोठ्या संख्येने हिमायतनगर येथे उपस्थित राहावे, अशी विनंती बालाजी प्रल्हाद गायकवाड, जीवा दिगंबर गादेकर व सुमित युवराज पैले यांनी केली आहे.

या परिषदेसाठी मुख्य आयोजक म्हणून राजू भाऊ कि. गायकवाड व अजय पंडितराव बनसोडे तसेच समस्त मातंग समाज हिमायतनगर हे परिश्रम घेत आहेत.

स्थळ: बस स्टँड, हिमायतनगर (जि. नांदेड)
वेळ: सायंकाळी ६:३० ते १०:००

## किनवट सामाजिक वनीकरण विभागातील प्रामाणिक सेवकाचा सन्मानपूर्वक निरोप, रामराव राठोडांची सेवापुर्ती

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

**किनवट –** सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, किनवट येथील सेवाभावी व कर्तव्यदक्ष कर्मचारी श्री. रामराव फुलसिंग राठोड यांनी दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी नियत वयोमानानुसार शासकीय सेवेतून सन्मानपूर्वक निवृत्ती स्वीकारली. त्यांच्या दीर्घ व उल्लेखनीय सेवेला मानाचा मुजरा करण्यासाठी विभागात छोटेखानी परंतु अत्यंत हृद्य निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वनपरिक्षेत्र अधिकारी डि. आर. पाटील उपस्थित होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून बी.ओ. किनवट अनिल कुमार महामुने यांची उपस्थिती लाभली. यावेळी वनपाल टि. ए. देवकते, पि. डी. सूर्यवंशी, एस. पी. डोईफोडे, बी. एस. भुरके, वनरक्षक एस. डी. खामकर, आर. के. गित्ते, सेवानिवृत्त गरड पाटील अंकुश राठोड, प्रा. किनवटचे लक्ष्मण शिंदे तसेच माय मराठी अकॅडमी व शिवांस अभ्यासिकाचे संचालक डी. जे. सर व राहुल सर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडला.

कार्यक्रमादरम्यान श्री. राठोड यांनी आपल्या दीर्घ सेवाकाळातील आठवणींना उजाळा देत सहकाऱ्यांचे सहकार्य, वरिष्ठांचे मार्गदर्शन आणि निसर्गसंवर्धनाच्या कार्यातील अनुभव मनोगतातून व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषणात वनपरिक्षेत्र अधिकारी डि. आर. पाटील यांनी श्री. राठोड यांच्या प्रामाणिक, कर्तव्यदक्ष आणि निसर्गप्रेमी स्वभावाचा गौरव करत त्यांच्या सेवेमुळे विभागाची प्रतिष्ठा वाढल्याचे सांगितले. पुढील आयुष्यासाठी त्यांना निरोगी, आनंदी व समृद्ध जीवनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

**"निसर्गाशी नातं आयुष्यभर टिकणार", राठोड यांचे मनोगत**

निरोप समारंभात बोलताना श्री. राठोड भावुक झाले. त्यांनी सांगितले की, वनभूमीत घालवलेली वर्षे त्यांच्या आयुष्यातील सर्वात समृद्ध काळ ठरली. लावलेले प्रत्येक रोप त्यांनी लेकरासारखे जपले आणि त्यांची वाढ पाहणे म्हणजे आयुष्याचे समाधान असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.



कार्यालयाने केवळ नोकरी नव्हे तर आयुष्याला अर्थ दिला, सहकाऱ्यांचे प्रेम, वरिष्ठांचे मार्गदर्शन आणि गावकऱ्यांच्या सहकार्यामुळे सेवा यशस्वीपणे पूर्ण करता आली, असे ते म्हणाले.

निसर्ग आपल्याला नि:स्वार्थपणे देतो; त्याचे संवर्धन करणे ही आपली जबाबदारी आहे, अशी जाणीव त्यांनी व्यक्त केली. सेवेतून निवृत्त होत असलो तरी निसर्गप्रेमातून कधीही निवृत्त होणार नाही आणि पर्यावरण रक्षणासाठी पुढेही कार्यरत राहीन, अशी ग्वाही त्यांनी दिली.

शेवटी उपस्थित मान्यवरांच्या शुभेच्छा व सहकाऱ्यांच्या प्रेमळ निरोपात कार्यक्रम भावनिक वातावरणात संपन्न झाला.

## विज्ञानाच्या नवकल्पनांची झलक ; ब्ल्यू बड्र्स टेक्नो स्कूल, गडगा येथे राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा

* आत्ताच एक्सप्रेस
**कल्पना डांगे**

**शिराढोण–** ब्ल्यू बड्र्स टेक्नो स्कूल, गडगा येथे २८ फ ेब्रुवारी २०२६ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त भव्य व आकर्षक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . यात १७० सहभाग विद्यार्थी विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला . विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा, संशोधनाची आवड निर्माण व्हावी तसेच विज्ञानाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व समजावे या उद्देशाने विविध शैक्षणिक व वैज्ञानिक उपक्रम राबविण्यात आले. वक्तृत्व स्पर्धा श्रेया डांबरगे , श्रावण डांगे , कपिला खुजडे , चित्रकला स्पर्धा सोहम जाधव , धनश्री शिंदे , महेश्वरी कुरुळे , विज्ञान प्रदर्शन गट अ संस्कार कोरे , प्रियांशी पाटील ,




गट ब , शिवानंद कोंडकेवाड , अमोल बन , गट क राजेंद्र स्वामी , अबू सुफवान शेख , पांडुरंग एकाळे , मनोज भांगे , प्रश्नमंजुषा स्पर्धा : आराध्या जाधव , सोहम डुकरे , ओम हते , विज्ञान रांगोळी स्पर्धा : शुभांगी वडजे या विद्यार्थ्यांनी बुद्धीच्या बळावर पारितोषिक मिळवले .

कार्यक्रमांतर्गत विज्ञान प्रदर्शन, प्रत्यक्ष प्रयोग सादरीकरण, नाविन्यपूर्ण विज्ञान मॉडेल स्पर्धा व विज्ञान विषयक मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. " " या संकल्पनेवर आधारित विद्यार्थ्यांनी सादर केलेले विविध वैज्ञानिक प्रकल्प कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले. विद्यार्थ्यांच्या कल्पकता, संशोधन वृत्ती व वैज्ञानिक विचारांचे उपस्थितांनी कौतुक केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आलापुरे सर उपस्थित होते, तर गुरुकुल इंग्लिश मीडियम स्कूलचे प्राचार्य कल्याण सर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

यावेळी विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करणारे गीत सादर केले. चिमुकल्यांच्या या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्य व्यवस्थापक तथा अध्यक्ष नंदेश्वर कोरे सर , पूजा कोरे मॅडम , आवेज सर ,, गंगाधर सर , भाकरे सर , जाधव सर , मठपती सर , मारुती सर , शिजो सर , इंद्रायणी मॅडम , कवाली मॅडम , बन मॅडम, पांचाळ मॅडम , राजुरे मॅडम , मलदोडे मॅडम , जाधव मॅडम , गौशिया मॅडम , शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली असून विद्यार्थ्यांना उत्स्फूर्त प्रोत्साहन मिळाले.

## मांडवी अप्पर तहसील कार्यालयासाठी संध्याताई राठोड यांची ठाम मागणी; प्रशासनाच्या उदासीनतेवर तीव्र नाराजी

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

**किनवट –** मांडवी येथील अप्पर तहसील कार्यालय स्थापनेच्या मागणीवर प्रशासनाची होत असलेली उदासीनता पुन्हा एकदा चर्चेत आली असून, या पार्श्वभूमीवर भाजपा महिला मोर्चाच्या नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष सौ. संध्या प्रफुल राठोड यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना सविस्तर निवेदन देत तात्काळ मान्यता देण्याची ठाम मागणी केली आहे.

स्थानिक पातळीवर दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या या मागणीसंदर्भात पूर्वी जिल्हाधिकारी नांदेड, तहसील कार्यालय किनवट तसेच उपविभागीय अधिकारी कार्यालयाने सकारात्मक अहवाल सादर केला असून शासन स्तरावरही पत्रव्यवहार झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तरीही निर्णय लांबणीवर पडत असल्याने मांडवी परिसरातील नागरिकांमध्ये नाराजी वाढत असल्याचे दिसून येत आहे.

मांडवी व परिसरातील गावे भौगोलिकदृष्ट्या दुर्गम, आदिवासी बहुल आणि प्रशासकीयदृष्ट्या विस्तीर्ण क्षेत्रात पसरलेली आहेत. महसूल विषयक कामांसाठी नागरिकांना किनवट तहसील कार्यालयात जावे लागते. मोठे अंतर, वाहतूक अडचणी व आर्थिक खर्च यामुळे सर्वसामान्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो.

मांडवी हे केंद्रस्थानी गाव असून सुमारे बावन्न गावांसाठी सोयीचे ठिकाण आहे. येथे स्वतंत्र अप्पर



तहसील कार्यालय सुरू झाल्यास जमाबंदी उतारे, फ ेरफार, वारसा नोंद, जात व उत्पन्न प्रमाणपत्रे तसेच इतर महसूल सेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध होतील. यामुळे प्रशासनाचा वेग वाढेल आणि शासनाच्या योजना प्रभावीपणे राबविणे सुलभ होईल, असे राठोड यांनी नमूद केले आहे. दरम्यान, स्थानिक दैनिकांमध्येही "मांडवीच्या मागणीवर प्रशासनाची उदासीनता" या आशयाच्या बातम्यांमुळे या प्रश्नाला अधिक धार मिळाली आहे. नागरिकांना दिलासा देण्यासाठी शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा लोकआंदोलन उभारण्याची भावना परिसरात वाढत असल्याचे संकेत मिळत आहेत. "मांडवी अप्पर तहसील कार्यालय हा परिसराच्या विकासाचा प्रश्न असून नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही पाठपुरावा सुरूच ठेवणार," असा इशारा सौ. संध्या राठोड यांनी दिला.

## पालाईगुडा ते कुपटी राज्यमार्गाचे काम शेतकऱ्यांनी पाडले बंद

### जोपर्यंत शेतिचा मोबदला मिळणार नाही तोपर्यंत काम सुरू होऊ देणार नाही शेतकऱ्यांची भूमिका, शारदा कंट्रक्शन ने सुरू केलेले रस्त्याचे काम शेतकऱ्यांनी पाडले बंद

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

**श्रीक्षेत्र माहूर –** किनवट माहूर तालुक्यातील सारखणी पालाईगुडा कुपटी ते फुलसावंगी राज्यमार्ग क्रमांक ५१ चे पालाईगुडा ते कुपटी येथून सुरू करण्यात आलेले काम शेतकऱ्यांनी बंद पाडले असून जोपर्यंत शेतीचा मोबदला देणार नाही तोपर्यंत काम सुरू करू देणार नाही अशी भूमिका घेत रस्त्याचे काम दि २६ रोजी दुपारी बंद पाडल्याने अधिकारी व कंत्राटदारांना हात हलवत परत जावे लागल्याची घटना घडली आहे

राज्य मार्ग ५१अंतर्गत सारखणी पलाईगुडा ते कुपटी सलाईगुडा लसनवाडी चोंरड भोरड वानोळा पानोळा जुनापाणी पाचुंदा इत्यादी गावासह पैनगंगा नदीपलीकडील विदर्भात असलेल्या महागाव तालुक्यातील फुलसावंगी पर्यंत सदरील रस्ता जाणार असून या रस्त्याची रुंदी वाढवली जात असल्याने अनेक शेतकऱ्यांच्या शेतजमिनी या रस्त्यात जाणार असल्याने नियमाप्रमाणे मोबदला दिल्यानंतरच काम सुरू करायला पाहिजे होते तसे न करता पालाईगुडा व कुपटी येथील २० ते २२ शेतकऱ्यांना मोबदला देऊन उर्वरित दीडशेच्यावर शेतकऱ्यांना एक रुपयाही न देता त्यांच्या जमिनीची चे सपाटीकरण करण्याचा सपाटा कंत्राटदारांनी सुरू केल्याने शेतकऱ्यांनी दि २६ रोजी आंदोलनात्मक पवित्र घेत सदरील काम बंद पाडले

८० फूट रुंदीचा रस्ता व दोन्हीकडून १० फुट रुंदीच्या नाल्या असा एकूण शंभर फूट रुंदीचा हा रस्ता तयार होणार असल्याने एम एस आय डी सी विभागाने आधी शेतकऱ्यांची बैठक घेऊन सन्माननीय तोडगा काढत शासन नियमाप्रमाणे मोबदला दिल्यानंतरच कामे सुरू करावे अशी मागणी आंदोलन कर्त्या शेतकऱ्यांची असून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तात्काळ या प्रकरणी दखल घेत शेतकऱ्यांची बैठक घेऊन त्यांना मोबदला दिल्यानंतरच काम सुरू करावे अशी मागणी आंदोलन करते शेतकऱ्यांनी यावेळी केली आहे.




हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंडे यांनी फाईन प्रिंट, १४०७०, खोकडपूरा, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र), येथे छापून लक्ष्मी ऑफसेट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या जवळ, रेल्वे स्टेशन रोड, परभणी जि.परभणी-४३१४०१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. मुख्य कार्यालय ०२४०-२४७४८१३ * **संपादक - सुग्रीव सोपानराव मुंडे** मो.9421281078, RNI.No.MAH/MAR2014/56289

The Printer, Owner & Publisher Sugriv Sopanrao Munde Fine print,14070,khokadpura, Aurangabad-431001 (M.H.) Laximi offset,Near Dr.babasahen ambedkar,statue,station road, parbhani Dist. Parbhani-431401.(edition editor Laximikan mundhe) (cheif Editor - Sugriv Sopanrao Munde) Office Ph. : 0240-2474813